बेटी बचाओ • बेटी पढाओ

विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट
द्वारा संचालित

# मातोश्री

## मातोश्री कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट

E-mail : makm.college@gmail.com

२०२२
वार्षिकांक

# आमचे मार्गदर्शक



## श्री. पांडुरंगजी तुळसकर

अध्यक्ष

विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट, जि. वर्धा.

# मातोश्री वार्षिकांक २०२१-२०२२

## संपादक मंडळ

कार्यकारी संपादक

प्रा. अभय हिरामणजी दांडेकर

**सहसंपादक**

प्रा. सपना जयस्वाल

प्रा. मोनाली गिरडे

प्रा. वैशाली तडस

प्रा. मोनीका मावूस्कर

*** मराठी विभाग**

प्रा. सुवर्णा कान्होलीकर

प्रा. अजय विरे

प्रा. भाग्यश्री सावळे

*** इंग्रजी विभाग**

प्रा. संगीता लांडगे

*** हिंदी विभाग**

प्रा. डॉ. स्वर्णलता बागडे

*** साहित्य संकलन व संपादन**

प्रा. प्रणिता आष्टणकर

प्रा. आचल वैद्य

*** छायाचित्र मांडणी**

प्रा. आशा घाटे

प्रा. प्रतिभा दुबे

*** विद्यार्थी संपादक मंडळ ***

कु. तेजस्वीनी देहारी - बी.ए. भाग-२

कु. आकांक्षा जयस्वाल- बी.ए.सी. भाग-२

कु. वैष्णवी लोखंडे - बी.ए.सी. भाग-१

कु. राणी गुप्ता - बी.कॉम भाग-३

*** प्रकाशक**

प्राचार्य डॉ. उमेश तुळसकर

*** मुद्रक**

अवनी ग्राफिक्स, हिंगणघाट

*** ग्राफिक्स/अक्षरजुळणी**

श्री. प्रकाश घोडे

या वार्षिकांकामध्ये प्रकाशित झालेल्या साहित्यातील/लेखांमधील मते ही त्या लेखकांची स्वत:ची मते असून त्यांच्याशी प्रकाशक, मार्गदर्शक, वार्षिकांक समिती, संपादक मंडळ किंवा संस्था सहमत असेलच असे नाही.

- प्रकाशक

एकूण प्रति - १५००

# मनोगत...

महाविद्यालयीन घडामोडींचा शब्दरूपी वेध घेणारा 'मातोश्री' २०२१-२२ वार्षिकांक आपल्या हाती देतांना मनस्वी आनंद होत आहे.

आमचे महाविद्यालय महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त संलग्नित आहे. या महाविद्यालयाची सुरूवात जून, २०१८ मध्ये झाली. पदवी स्तरावरील कला-वाणिज्य व विज्ञान शाखांमध्ये केवळ २००-२५० विद्यार्थीनीच्या प्रवेशाने सुरू झालेल्या महाविद्यालयात आज जवळजवळ ७०० विद्यार्थीनी शिक्षण घेत आहेत.

आमचा उच्च गुणवत्ताधारक व आचार्य पदवी प्राप्त प्राध्यापक वर्ग कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थीनींना उत्कृष्टरित्या विद्यादान करीत आहे.

सांस्कृतिक महोत्सव, राष्ट्रीय सेवा योजना, महिला अध्ययन केंद्र, या आणि अशा अनेक शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थीनींचा सर्वांगीण विकास साधणे हेच आमचे ध्येय आहे. अनेक खेळांमध्ये विद्यार्थीनीनी विद्यापीठ व राज्यस्तरावर प्रतिनिधीत्व केले आहे.

विद्यार्थीनीच्या उत्कर्षासाठी सर्व सुविधायुक्त संगणकीय कार्यालय व ग्रंथालय, विज्ञान प्रयोगशाळा इ. योजनांसह विद्यार्थीनीकेंद्री शिक्षणव्यवस्था राबविण्याचा आमचा संकल्प आहे.

आधुनिक शैक्षणिक सोयीसुविधा तळागाळातील विद्यार्थीनीपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने व आमच्या संस्थेतील पदाधिकाऱ्यांच्या प्रेरणेमुळेच 'मातोश्री' सारखा अंक आपल्या हाती देता येणे शक्य झालेले आहे.

आदरणीय श्री.पांडुरंगजी तुळसकर, अध्यक्ष, विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट, डॉ.निलेश तुळसकर, उपाध्यक्ष, यांचे सदैव-तत्पर मार्गदर्शन व सहकार्यामुळेच हे सर्व शक्य होत आहे. तसेच सेवेचे व्रत उराशी बाळगणारे समस्त कर्मचारीवृंद व आमच्या विद्यार्थीनी यांचेही सहकार्य मोलाचे आहे.

'मातोश्री-२०२२' या अंकात अनवधानाने काही त्रुटी आढळल्यास संपादक मंडाळाच्या निदर्शनास आणून द्याव्यात जेणेकरून पुढील अंकात त्यासंदर्भात दक्षता घेता येईल, अशी अपेक्षा करतो. शेवटी सर्वांना नवीन वर्षाच्या शुभेच्छांसह, धन्यवाद !

प्राचार्य
**डॉ. उमेश तुळसकर**
मातोश्री महिला महाविद्यालय,
हिंगणघाट, जि. वर्धा.

# संपादकीय...

माझ्या लाडक्या विद्यार्थीनींनो....

या वर्षी आपल्या महाविद्यालयात तुमच्या कलागुणांना शब्दांकित करत शब्दांना नवा आकार देत तुमच्या भावविश्वाला साकारत 'मातोश्री' वार्षिकांक प्रकाशित होत आहेत. तुमच्या कलात्मकतेचा आरसा, तुमच्या भावजीवनाचा सखासोबती, तुमच्या सर्जशीलतेचा भाष्यकार, मातोश्री आशाताई कुणावार महिला महाविद्यालयाचा चेहरा असणारा मातोश्री अंक तुमच्यापर्यंत पोहचवताना अतिशय आनंद होत आहे. कारण विद्यार्थीनींनो मातोश्री फक्त कागदी दस्ताऐवज नाही तर तो भूत, भविष्य आणि वर्तमानाच्या संचिताचा मोठा ठेवा आहे...

तुमच्या कलात्मक जीवनाला नवा आकार मिळावा, तुमच्या आतला आवाज बाहेर यावा, तुम्ही बोलते व्हावे, लिहिते व्हावे. देशातील समकालीन प्रश्नांवर आणि सभोवतालच्या चांगल्या वाईट परिस्थितीवर तुमचं संवेदनशील मन बोलतं, लिहितं व्हावं हाच मातोश्री अंकाचा हेतू. माझ्या विद्यार्थीनी वाङ्मयीन, सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक जीवनात पारंगत व्हावी यासाठीच मातोश्री अंकाची निर्मिती करणे होय..

विद्यार्थीनीच्या ललित वाङ्मयीन लेखनातून, अभ्यासपूर्ण लेखातून, काव्यातून, आणि आपल्या महाविद्यालयातील अभ्यासू, कष्टाळू प्राध्यपकांच्या केलेल्या शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्याचा आढावा मातोश्री वार्षिकांकात लेखनरूपानं साकार झाला आहे. नक्कीच विद्यार्थीनीना यातून ऊर्मी मिळेल यात दुमत नाही.

मातोश्री वार्षिकांकरिता खूप मोठा मदतीचा हात देणारे आमचे मार्गदर्शक आदरणीय श्री.पांडुरंगजी तुळसकर, अध्यक्ष, विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट, मा.डॉ.निलेश तुळसकर, उपाध्यक्ष, प्राचार्य डॉ.उमेश तुळसकर, यांचे मनापासून आभार व्यक्त करतो. कारण यांच्या मायेच्या उबेशिवाय मातोश्री अंक आकार घेऊ शकला नसता.

मला आणि मातोश्री वार्षिकांकाच्या जडणघडणीत आपुलकीने मदत करणारे वार्षिकांक समिती सदस्य प्रा. सपना जयस्वाल, प्रा. अश्विनी चौधरी प्रा. वैशाली तडस, प्रा. मोनाली गिरडे आणि महाविद्यालयातील विद्यार्थीनी तसेच उत्कृष्ट टंकलेखन करणारे श्री. प्रकाश घोडे सजावट करणारे अवनी ग्राफिक्स, हिंगणघाट या सर्वांच्या सहकार्यानं मातोश्री वार्षिकांक कमीत कमी वेळेत तयार झाला. यासर्वांचे मनापासून आभार मानतो आणि माझ्या शब्दरूपी संपादकीय भाष्याला थांबवतो...

पुन्हा भेटू...

**प्रा. अभय हिरामणजी दांडेकर**
(इंग्रजी विभाग)
मातोश्री महिला महाविद्यालय, हिंगणघाट, जि. वर्धा.



# विज्ञानवादी विचार

१) डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम : जन्म

२) डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम : शिक्षण व पदवी

३) डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम : भारताचे विज्ञान सल्लागार

४) डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम : राजनिती जीवन

५) डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम : अखेरचा श्वास

भारत देशाचे सुपुत्र मिसाइल मॅन, राष्ट्रपुरुष, राष्ट्रमहादर्शक, महान वैज्ञानिक, महादार्शनिक देशभक्त असुन अशा महान शब्दांनी अब्दुल कलाम यांना बोलवले जात असे. भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम हे खऱ्या अर्थाने भारतरत्न होते. सर्वात महान डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम हे खरे व्यक्ती होते. ज्यांनी मातृभूमी सोबत नाळ जुळवून घेऊन एका राष्ट्रपतीच्या रूपात लोकांच्या मनात जागा बनवली. एक असा व्यक्ती मुलांच्या, व्यक्तींच्या, म्हाताऱ्यांच्या, सर्वांच्या मनात लोकप्रिय होते. देशाची सर्व मुलं त्यांना आदर्श मानत होते व त्यांचे ते रोल मॉडेल होते.

**डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्म :-** डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम जी चा जन्म १५ ऑक्टो. १९३१ ला तामिलनाडुच्या रामेश्वरम या धनुष्यकोटी गावामध्ये झाला होता. एका मध्यम वर्गीय मुस्लिम परिवारामध्ये त्यांचा जन्म झाला होता. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या विचारामध्ये महानता युवा सोच आणि आजिवन शिक्षण ची भुमिका असल्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघा ने त्यांच्या सन्मानार्थ सन २०१० मध्ये त्यांच्या जन्मदिवशी म्हणजेच १५ ऑक्टो. ला विश्व विद्यार्थी दिवस साजरा करण्याचा निर्णय घेतला होता. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम मुलांवर खुप प्रेम करत होते. शाळेच्या मुलांना त्यांच्या जीवनात प्रेरणा मिळण्याच्या उद्‌दशाने त्यांचा जन्मदिवस विश्व विद्यार्थी दिवस म्हणून संपूर्ण जगात साजरा करण्यात येतो. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या वडीलांचे नाव जैनुलाब्दीन होते. त्यांचे वडील जैनलाब्दीन हे जास्त शिकले-सवरले नव्हते. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या आईचे नांव आशिअम्मा होते. जी की एक गृहीणी होती. आई वडीलांनी त्यांना संस्कार आणि कठीण परिश्रमाचे धडे देत त्यांना महान बनवलं. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे वडील एका स्थानिक मज्जिदचे इमान होते. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम संयुक्त परिवारामध्ये राहत होते. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांना पाच भाऊ-बहीण होते. त्यामध्ये ते सर्वात छोटे होते. त्यांच्या जीवनावर त्यांच्या वडीलांच्या विचारांचा फार मोठा प्रभाव होता. त्यांची म्हत्वकांक्षा व परिश्रम ही वाखाणन्यासारखी आहे.

**डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच शिक्षण व पदवी :-**

डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम जी ने १९५८ मध्ये मद्रास इन्स्टीटुट ऑफ टेक्नॉलॉजी मधुन अंतरीक्ष विज्ञानमध्ये उपाधी प्राप्त केली. त्यानंतर डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांनी हावरक्रॉप योजना वर काम करण्यावर भारतीय रक्षा अनुसंधान आणि विकास संस्थान मध्ये प्रवेश दिला. त्यांतर

डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम १९६२ मध्ये भारतीय आंतरीक्ष अनुसंधान संघटन इजरो मध्ये आले. ज्यात त्यांनी आपली कठीण मेहनत आणि सद्सद्विवेक बुद्धीची चमक दाखवली. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या भरोशावर योजना निर्देशक राहत होते. देशाचा पहीला स्वदेशी उग्र एसेलवी ३ जुलै १९८० ला लाँच केल गेल होत. या लाँचर च्या माध्यमातुन रोहीणी उग्र च्या वर्गाला स्थापीत केल गेल होत. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम काही वर्ष इजरोमध्ये परियोजक च्या रूपा मध्ये भारत आंतरीक्ष ला समोर वाढवल. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम आपल्या यशाचे श्रेय आपल्या आईला देत होते. अग्नि मिसाइल आणि पृथ्वी मिसाईल हे त्यांच्या सफल परिश्रमाचे श्रेय होय. त्यांनी नागासारखी ताकतवान मिसाईल बनवली. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांनी भारताला अंतरीक्ष मिसाइलच्या क्षेत्रात एका विशिष्ट उंचीवर पोहचवलं. एक वेळ होता, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम देशाच्या पहिल्या रॉकेट ला साइकील वर ठेवुन प्रक्षेपक स्थळावर घेऊन गेले होते. ज्याच्या साठी नारीयल च्या झाडाला लाँचीक झाड बनवल गेल होत. अॅझमिशन चा दुसरा रॉकेट मोठा आणि भारी होता. ज्याला बैलगाडीवर प्रक्षेपक स्थळावर घेऊन गेले होते.

**डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम : भारताचे विज्ञान सल्लागार** - डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम १९९२ ते १९९९ चे रक्षामंत्री चे विज्ञान सल्लागार, सुरक्षा शोध विकास चे सचिव होते. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम च्या देखरेखीमध्ये भारताच्या १९९८ मध्ये पोखरन मध्ये आपला दुसरा परमाणु शिक्षण केल. भारत देशाच्या परमाणु शक्ती संपुर्ण देशाच्या परमाणु शक्ती संपुर्ण देशाच्या सुची मध्ये शामिल केल. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांना देशासाठी केलेल्या योगदान बद्दल १९८१ मध्ये भारत सरकार ने देशाचा सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित केलं. पद्मभुषण आणि १९९० मध्ये पद्मविभुषण १९५० मध्ये भारत रत्न प्रदान केल.

**डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची राजनिती जीवन :-** डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम २००२ ते २००७ पर्यंत देशाचे राष्ट्रपती राहले. आमचे पुर्व राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांनी आपले संपूर्ण जीवन देशासाठी प्रदान केलं. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांना २००२ मध्ये विपक्ष आणि पक्ष भाजपा आणि काँग्रेस यांच्या संमतीने बारा उमेदवारामधुन एक उमेदवार म्हणून निवडलं. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांना राष्ट्रपती बनवण्यासाठी पुर्व प्रधानमंत्री अटल बिहारी वाजपेयी स्वत: कॉग्रेस अध्यक्षा सोनिया गांधीजी यांच्याकडे प्रस्ताव घेऊन गेले. त्यांच्या सहमतीने व बहुमताने प्रस्ताव पास झाला.

**डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम : अखेरचा श्वास :-** डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम हे शेवटच्या श्वासापर्यंत शिक्षकाच्या भुमिकामध्ये राहिले. ते युवकांचे प्रेरणास्थान राहिले. २७ जुलै २०१५ च्या रात्री डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम आय आय टी लांग वरून एक व्याख्यान देत होते. तेव्हा त्यांना अस्वस्थ वाटले व ते बेहोश होऊन जमीनीवर पडले. गंभीर परिस्थितीत त्यांना दवाखान्यात आयसीयु मध्ये घेऊन गेले. अवघ्या २ तासानंतर तेथील त्यांना डॉक्टरांनी मृत्यु घोषीत केल. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम जाता जाता देशासाठी, देशाच्या भावी पिढीसाठी, एक शिक्षक सोडुन चालले गेले. ते कुवारे राष्ट्रपती होते. बेशक डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांना देशाचा प्रत्येक युवा नागरीक आदर्श मानत होता.त्यांनी आपल्या कार्यातुन शत्रू राष्ट्रानाही एक नविन विचार प्रदान केला होता. की ज्यामुळे ते ही कलाम यांना आपला आदर्श मानत होते.

त्यांचे विचार नेहमीच युवकांसाठी प्रेरणादायी ठरतील असेच आहे. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम म्हणत होते की,

सपने वो नही होते।
जो निंद मे देखे जाते॥
सपने तो वो होते है।
जो रातो मे सोने नही देते॥
और हमेशा लोगो से कहते थी की,
उचे सपने देखो,
जब तक की,
पुरे ना हो॥

डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम साधा विचार आणि कडी मेहनत वर विश्वास ठेवत होते.



कु. श्रध्दा अलोने
वि. कॉम. भाग-३

# राजकारणी तालीम

जय जवान, जय किसान
शास्त्रीजींचा हेतू नि:स्वार्थ आहे,
राजकारणी गमतीदार तालमीत मात्र
जवान विरोधी किसान लढत आहे.
तळा-गळातला नागरिक सुरक्षित
हा घटनेचा गाभा आहे,
राजकारणी गमतीदार तालमीत मात्र
नट, नटी आणि पूढारीलाचं सुरक्षा आहे.

शेत आमचं, अन्न आमचं
पोशिंदाला विचाराने अपेक्षित आहे,
राजकारणी गमतीदार तालमीत मात्र
अन्नदाता कुपोषित झाला आहे.

संधीसाधू राजकारण पायी
घटना बिचारी हुंदके देत आहे,
राजकारणी गमतीदार तालमीत मात्र
जवान, किसान शहीद होत आहे.

कु. तेजस्वीनी देहारी
बी. ए. भाग-२

# कोरोना व्हायरस

या जगामध्ये मनुष्याने अनेक रोगांचा सामना केला आहे पण आज संपूर्ण जगभरात एका अशा व्हायरसने थैमान घातला कि ज्यामुळे संपूर्ण दुनिये झोप उडाली आहे.

लोकांच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ज्यामुळे सर्वांचे जीवन जगणे कठीण बनले आहे. या व्हायरसंच नाव आहे कोरोना व्हायरस जगामध्ये सर्वत्र धुमाकूळ घालणारा कोरोनाचा विषाणू हा अतिसूक्ष्म, धोकादायक विषाणू आहे. कोरोना विषाणूच्या संक्रमणाची सुरूवात डिसेंबर २०१९ मध्ये चीनच्या वुहान या शहरातून झाली या कोरोना व्हायरस पासून बाचण्यासाठी काही नियम सुध्दा पाळणे आवश्यक आहे. ते आपल्याला आजार बरा होण्यास मदत करू शकतात आणि असल्या घातक आजारा पासुन दुर ठेवू शकता. डॉक्टरांच्या सल्ल्याने मास्क वापरणे, गर्दीच्या ठिकाणी न जाणे, चेहऱ्याला हात लावण्यापूर्वी हात स्वच्छ धुणे, सॅनिटायझर किंवा साध्या साबण पाण्याने हात वरचे वर धुवायचे.

कोरोना वायरस एक भयानक बिमारीचे नाव आहे. जी चीन च्या वुहान शहरातून पसरली आहे. कोनोना व्हायरस हा धातक विशाणू जग भर पसरलेला आहे. या आजाराने इतका धुमाकूळ घातला की खुप बरेच दिवस घराबाहेर पडणे ही मुश्कील झालेले होते.

शाळा, कॉलेजही बंद करावे लागले त्यामुळे ही विद्यार्थ्यांचे खुप नुकसान ही झालेले आहेत बाहेर गावाला जे आपले घर आई व वडील मुल बाळ सोडून राहत होते त्यानला पण खुप त्रास झालेला आणि गाडाया आणि सगळे काही बंद झाल्यामुळे त्यानला आपल्या घरी जायचा अपाय व पर्यायाय दिसेना ते पांइदल जाला लागले त्या प्रवासामध्ये काहींचा अपघात पण झाला ते घरी पोहचू शकले नाही. तर उपाशी तापाशी रात दिवस पाइदल चालून आपल्या घराचा गावाचा प्रवास ठरवला तर उना ताना मध्ये छोटे छोटे मुल घेऊन त्ये जाण्यारे लोक खरच खुप धकादायक होते काही मुल विद्यार्थी विद्यार्थीनी बाहेर गावाला शीकक्षण घेण्यासाठी गेलेले त्याना ही खुप प्रोबलेम झाला. आताही तो आजार कमी झाला म्हणता येणार नाही म्हणून सावधान रहलेल कधीही धान आहे.

म्हणून स्वताची काळजी स्वाता घ्या ला पाहीजे स्वताची स्वताच्या घरचानची मास्क लावलयाशीवाय बाहेर जाने टाळावे रस्त्यावर किवा कुठेही बाहेर सेनीटाइजेर मास्क चा वापर करणे गरजेची आहे. स्वाताची काळजी स्वातास घेणे अतंत्य महत्वायचे आहे. दिवस भऱ्यातून हात धुने ही म्हत्वाचे आहे तेवाय त्या घातक बिमारी पासुन दुर राहु आणि त्याघातक बिमारी ला स्वाता पासुन ही दूर ठेवू तसेच नुकसान ही फार झालेले आहेत येवल्या दिवसातील या महामारीत विद्यार्थ्याचे नुकसान शेतकऱ्याचे ही नुकसान झालेले आहे. काही

दिवस तर बाजार पण भरत नवता तर शेतीतले पीक तसेच मारणे शेतीतस राहले काही त्याच हि नुकसान झालेल आहे तसेस जे जॉब करत होते त्यावल्या कॉम्पण्या येवल्या दिवसाच्या लॉकडाऊन मुळे बंध पडल्या आहेत त्यांचे पण खुप नुकसान झालेले आहेत त्यानची जॉब गेलेली आहे त्यानची जॉब गेल्या मुळे त्यानला आरवी जॉब मिळायला वेळच लागेल त्यानचे ही फार नुकसान झालेले आहे.

वशास प्रमाणे आपण सरकारच्या नियमांचे पालन करून आपली स्वत:ची आणि कुटुंबाची काळजी घेऊन घरात सुरक्षीत राहून या कोरोना योध्दांना मदत करू शकतो. तितके कमीच आहे. त्यांच्या या संघर्षामुळे आजपर्यंत अनेक कोरोना रूग्ण बरे होऊन आपल्या घरी परतले आहेत कोरोना योध्यांनी वेळोवेळी योग्य ती पावले उचलली म्हणून आज अनेक लोकांचे जीव वाचणे. आपल्याना आपल्यामुळे आपल्या कुटुंबाला कोरोनाची लागण होऊ नये म्हणून काही कोरोना योद्धा त्यांच्या कुटुंबापासून दूर राहिले इतकेच नव्हे तर संकटाशी लढताना अनेक डॉक्टर, नर्सेस, पोलीस यांना आपला जीव ही गमवावा लागला.

कुणी स्वत:चा धंदा जोपासला तर कुणी आवडते पदार्थ करून आपल्या कुटुंबासोबत घरात राहून तो क्षण चांगल्यारितीने पार पाडला परंतु या कोरोणा योद्धांनी स्वत:च्या कुटुंबाबत कुटुंबापासून दुर राहून स्वत:च्या जीवाची पर्वा न करता कारोनाशी संघर्ष दिला.

सुरूवातीच्या काळातच नव्हे तर आजही प्रत्येक योद्धा आपले कर्तव्य प्रमाणिकपणे पार पाडत आहे. लॉकडाऊन च्या काळात आपण सर्वांनी आपला वेळ आपल्या कुटुंबासोबत अतिशय आनंदाने आणि समाधानाने घालवला दिवस-रात्र सर्वत्र बंदोबस्त ठेवून पोलीसानी आपले काम अगदी व्यवस्थित आणि प्रामाणिकपणे केले कोरोना रूग्ण सापडलेला परिसर स्वच्छ, निर्जंतुक करण्याची जबाबदारी सफाई कर्मचाऱ्यांची होती ती जबाबदारी त्यांनी प्रमाणिकपणे निभावली आपल्याला वेळोवेळी भाजीपाला, दूध पुरवीणाचा लोकांनाही आपण विसरता कामा नये.

त्यामुळे सुरवातीच्या काळात भारत सरकारने संपूर्ण लॉकडाऊन जाहीर केला. सर्वजन आपआपल्या घरामध्ये सुरक्षीत रहावे, हाच त्यामगचा उद्देश होता, परंतु कोरोना योद्धांनी त्या काळात त्यांचे काम जबाबदार निभवली अशा कठीण परिस्थित स्वत:च्या जीवाची पर्वा न करता कोरोना बाधीत रूग्णांची सेवा करणारे ते खरे कोरोना योद्धा आहेत आपल्या देशाचे डॉक्टर, नर्सेस् पोलीस आरोग्य कर्मचारी, सफाई कर्मचारी हे सर्व कोरोना काळातील कोरोना योद्धा आहेत. कोरोना काळात आपल्या जीवाची पर्वा न करता आपले कर्तव्य प्रमाणिकपणे पार पाडणारे योद्धा म्हणजे कोरोना योद्धा. कोरोना व्हायरस ने आपल्या भारत देशालाच नव्हे तर

कु. आदिती राऊत
बी. ए. भाग-१

# जागतिक पर्यावरण दिवस

५ जून हा जागतिक पर्यावरण दिवस मानला जातो. पर्यावरणात जर आम्ही समतोल राखला तर मानव जात सृष्टीत टिकून राहील. पर्यावरण म्हणजे पृथ्वीवरील आणि पृथ्वीभोवतालच्या वातावरणाचा समतोल, हा समतोल राखण्यात वृक्ष, झाडे आम्हाला खूप मदत करतात म्हणूनच भारतीय संस्कृतीमधील वेगवेगळ्या वृक्षांची, रोपांची पूजा करण्याची परंपरा खुप दुरदृष्टीची म्हणावी लागेल. रोज संध्याकाळी तुळशीला पाणी घालून तिच्याजवळ दिवा लावायचा, वटपौर्णिमेला मोठमोठ्या पारंव्या असणाऱ्या वडाची पूजा करायची. या आणि अशा रीतीने वृक्षांचे जतन होते. पर्यावणाचा समतोल राखतात ग्लोबल वॉर्मिंगपासूणही आम्हाला हे वृक्ष वाचवतात. एकाच ठिकाणी उभी राहणारी झाडे, उन्ह, वारा पाऊस सहन करतात आणि दुसऱ्याणा सावली देतात. लाकुड, फळे, फुले, बिया, साल आणि औषधींमुळे सुद्धा आम्हाला हे वृक्षच देतात.

पक्षी, प्राणी कृमी असे अनेक जीव झाडांच्या आश्रयाने राहतात ऑक्सीजन म्हणजे प्राणवायूचे हे जणू कारखाने आहेत झाडे वाचली तर पर्यावरण सुरक्षीत राहील आणि पर्यावरण आमचे म्हणजे मानवजातीचे रक्षण करील म्हणून जंगलांचे रक्षण आम्ही केले पाहिजे. ही जंगले तयार व्हायला हजारो वर्षाचा काळ जावा लागेल. जंगले तोडायला मात्र अगदी थोडे दिवस पुरतात हे आम्ही विसरत आहोत.

उद्योग, कारखाने यांची बेफाम वाढ आज होते आहे. माणसे शहराकडे धाव घेत आहेत या साऱ्यासाठी निर्दयपणे झाडे तोडली जातात. वृक्षप्रेमाचे हे जुने नाते माणुस विसरला आहे. आता स्वत:च्या सवयी बदलायची वेळी आली आहे.

कागदापेक्षा ई-मेलचा अधिक वापर कमी ऊर्जेचे दिवे, वापरून काचेच्या वस्तूएवजी चिनी मातीच्या कपबश्या, पेपर नॅपकीन ऐवजी सुती टॉवेल. पाण्याचा जपून वापर हे आम्ही करायला हवे, पर्यावरणाचे भान आम्ही ठेवले तरच मानवजात वाचण्याची शक्यता आहे.

जगाला वाचविण्यासाठी जागतिक पर्यावरण दिवसाची योजना करण्यात आली आहे.



कु. स्नेहा शेंडे
बी. ए. भाग-१



# स्वामी विवेकानंद

## सन १८६३ ते १९०२

प्रस्तावना : स्वामी विवेकानंदांवदल भारतात सगळ्यांनाच माहिती आहे. स्वामी विवेकानंद यांचा जन्म १२ जानेवारी १८६३ या दिवशी झाला. सुरवातीच्या काळातच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यामुळे त्यांच्या कुटूंवाला खूप दुःख आणि दारिद्र्याला तोंड द्यावे लागले. अशा कठीण परिस्थितीत सुद्धा ईश्वरदर्शनाची त्यांची इच्छा कमी झाली नाही. त्याही काळात ते श्रीरामकृष्ण परमहंस यांना भेटत राहिले. एकदा त्यांनी श्रीरामकृष्णांना स्वतःच्या मुक्तीवदल विचारले. तेव्हा ते म्हणाले तुल्हा तर आईचे काम करायचे आहे.

भावावस्थेत असताना एकदा श्रीरामकृष्ण म्हणाले होते, शिवभावे जीवसेवा ईश्वर सगळीकडे भरून उरला आहे. प्रत्येक व्यक्ती ईश्वरमय आहे आणि म्हणूनच मानवसेवा ही ईश्वराची पूजा आहे. संपूर्ण विश्व म्हणजे ईश्वराची अभिव्यक्ती, हे सत्य असून सुद्धा आपल्याला ते समजत नाही. या सत्याच्या अनुभव होणे, आणि यानुसार आचरण व व्यवहार करणे म्हणजेच धर्म होय.

भारतीय समाजाला समजून घेण्यासाठी स्वामी विवेकानंदानी संपूर्ण भारताची परिक्रमा केली. शेतकरी, मजूर, व्यापारी, कलाकार, विद्वान, सरदार, राजेमहाराजे अशा झोपडयांमध्ये राहिले. कधी तर अगदी रस्त्यावर झाडाखाली सुध्दा राहिले. गरीव, दीन, दुःखी मागासलेल्या समाजाकडे वघून त्यांना खूप दुःख झाले त्यांच्या मनात विचार आला, की काय केल्याने आजच्या या स्थितीमध्ये सुधारणा होईल? काय केल्याने आपल्या गरीब देशबांधवांच्या अन्न, वस्त्र, निवारा या सारख्या प्राथमिक गरजांची पूर्तता होईल? काय केल्याने त्यांचा आत्मविश्वास जागृत होईल.? अशा प्रकारे दुःखी, चिंताक्रांत आणि अस्वस्थ मनःस्थितीत स्वामीजी कन्याकुमारीला येऊन पोहोचले. भारताचे उत्थन कसे होईल या एकाच विचाराने मन भरून गेले होते.

मी काय करू शकतो? मला काय करायला हवे, याच विचारात मग्न असताना भर समुद्रातून पोहून जात स्वामीजी श्री पादाशिलेदार जाऊन पोहोचले. तीन दिवस आणि तीन रात्री संपूर्ण ७२ तास ते तिथे ध्यानस्थ होते. भारताचा समृद्ध आणि गौरवशाली भुतकाळ आणि त्याचवरोबर वर्तमानातली दीन आणि गुलामगिरीची अवस्था त्यांच्या डोळ्यासमोर होती. त्यांनी भारताच्या सामर्थ्यावर चिंतन केले.

इश्वर सर्वत्र आहे, हे संपूर्ण अस्तित्व एकात्म आहे, परमात्म्याशी एकरूप आहे. भारताचे हे आध्यात्मिक ज्ञान हीच भारताची शक्ती आहे. भारत पुण्यभूमी आहे, तपोभूमी आहे, दीन, मागासलेले, गरीव या सगळ्यामध्ये ईश्वर आहे, विस्मृतीच्या पडद्याआड गेलेल्या या शक्तीला त्यांच्या हृदयात जागवलं पाहिजे, हेच माझे जीवितकार्य, यांची सेवा हेच माझ्या जीवनाचे ध्येय आणि हेच होतं स्वामीजींनी त्यांच्या गुरूंनी सांगितलेले "आईचं काम".

परदेशात जाऊन आपल्या देशबांधवांसाठी काय करता येईल, हा विचार त्यांच्या मनात होता. १८९६ मध्ये अमेरिकेतील शिकागो येथे होणाऱ्या सर्वधर्म परिषदेत भाग घेण्यासाठी ते अमेरिकेला गेले. दुर्दैवाने त्या समितीचा पत्ता त्यांच्याकडून हरवला, रेल्वे यार्डात पडलेल्या एका डब्यात रात्र काढावी

लागली. कुठल्याही प्रकारची मदत मिळाली नाही. उलट निग्रो, काळा कुत्रा अशा शब्दांचा मारा झाला. तरीही प्रयत्न मात्र त्यांनी सोडले नाहीत. शिकागोला दिलेल्या व्याख्यानामुळे स्वामीजी विश्वविख्यात झाले. अमेरिकेत सुखसोयींनी परिपूर्ण अशा प्रासादतुल्य अशा घरांमध्ये त्यांची राहण्याची व्यवस्था केली गेली. पण आपल्या दीन दरिद्री देशबांधवांच्या आठवणीमुळे ते झोपु शकले नाहीत मला इथ इतक्या सुखसोयी उपलब्ध आहेत आणि माझे देशबांधव ते किती दु:ख आणि गरिबी सहन करत आहेत काय केल्याने त्यांचे दु:ख दूर होईल? या विचाराने रात्रभर त्यांची तगमग होत राहिली. ज्याप्रमाणे एखादी आई आपल्या मुलाच्या दु:खाने तळमळते, त्याप्रमाणे स्वामीजी रात्रभर ओक्साबेक्शी रडत होते.

धर्म अनुभूती मध्ये आहे मतांमध्ये नाही. सगळे मार्ग एकाच ध्येयाकडे जातात. सगळ्यांच स्वीकार करा, तिरस्कार नाही. सगळ्यांशी प्रेमाचे नाते ठेवा, घृणा किंवा ईर्ष्या नाही. त्यांनी विश्वकुटूंबाचा विचार ठेवला, विश्वबंधुत्वाचा संदेश दिला. संपूर्ण जगामध्ये एका कुटूंबाप्रमाणे स्नेहमय वातावरण असावे, असे सांगितले जडवाद आणि हानिकारक विचारांची धर्मांधता यामुळे समाजामध्ये अशांती आणि हिंसा वाढेल आणि या सर्वांवर उपाय अध्याय हाच असू शकतो. त्यासाठी भारताला जागे व्हावे लागेल, समर्थ व्हावे लागेल.

पश्चिमेकडून ते भारतासाठी एक परितोषिक घेऊन आले- 'संघटना', संघटित होऊन आपणसमाजाचे भारतमातेची सेवा करू संघटित होऊन दु:ख दूर करण्याचा प्रयत्न करू हेच आपले कार्य आणि या कार्याचे सुत्र असेल त्याग आणि सेवा, समाजासाठी वेळ काढून समाजाची सेवा करू, सुखाचा त्याग करून, व्यक्तिगत कामे बाजुला सारून मिळालेला वेळ आणि शक्ती सेवाकार्यासाठी वापरू. हे कार्य युवकच करू शकतील, असा स्वामींजीना पूर्ण विश्वास होता, आणि म्हणूनच भारतात परत आल्यावर त्यांनी कोलंबोपासून ते अल्मोत्यापर्ययत प्रवास केला. आपल्या व्याख्यानांनी देशभरातल्या युवकांना प्रेरित केले ते म्हणत, माझा विश्वास आधुनिक तरूण पिढीवर आहे यांच्यातूनच माझे कार्यकर्ते पुढे येतील आणि सिंहाप्रमाणे आपल्या पुरूषार्थीने सर्व समस्या सोडवतील असा होता त्यांचा तरूणांवरचा विश्वास.

स्त्रिया शक्तिस्वरूपीणी आहेत ते म्हणायचे, सगळ्यांमध्ये आपला देश कमकुवत आणि मागासलेला आहे याचे कारण काय? कारण इथे शक्तीची अवहेलना होते, शक्तीचा अपमान होतो. शिक्षणाबदल ते म्हणतात. आपल्याला चारित्र्य, घडवणारं मानसिक शक्ती पाठवणारं, बुद्धीचा विकास करणारे, असं शिक्षण हवं आहे ज्यामुळे मनुष्य आपल्या पायावर उभा राहू शकेल.

राजे, महाराजे, सरदार आणि विद्वान यांना त्यांनी समाजाच्या सेवेसाठी प्रेरित केले. व्यवसायाव रोबर रोजगार आणि समृद्धी येईल हे जाणून त्यांनी टाटांसारख्या उद्योजकांना विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या अभ्यासाला प्रेरणा दिली मानवाने आपल्यातील सुप्त शक्तीपैकी अगदी कणभरच शक्ती प्रकट केली आहे. स्वत:स दुर्बल समजु नका, तुमच्या या अध:पतनास किती करणे आहेत याची तुम्हालां जाणीव आहे का? तुमच्यामधील शक्तीची तुम्हांस अगदी क्षुल्यत्कही कल्पना नाही. तुमच्या ठायी शक्तीचा महासागर हेलावतो आहे.

आम्ही केवळ सहिष्णू आहोत एवढेच नव्हे तर जगातील अन्य धर्म-मग ती मशिदीत महमंदसदाची पार्थना करणारा असो, अग्नीची पूजा करणारा असो वा ख्रिस्ताच्या कसापुढे गुडघे ठेकून प्रार्थना करणाऱ्यांना असो वा अन्य अगदी प्राथानिक अवस्थातील रानटी धर्म असो ते सारे त्या अनंत परमेश्वराच्या साक्षात्कारी अनुभूतीसाठी केलेले मानवी आत्म्याचे प्रयास आहेत. असे आम्ही हिंदू मानतो. ज्याचा त्याचा जन्म व आजूबाजूच्या वातावरणाने हे फरक दिसतात सारे मार्ग हे मानवी प्रगतीचे आहेत, असे आम्ही हिंदू मानतो, आम्ही ही

सारी सुमने वेचतो, प्रेमाच्या रज्जूने एकत्र गुंफतो व परमेश्वरचरणी अर्पितो, जगाच्या पाढीवर भारत ही एकमेव भुमी आहे. की जेथे धार्मिक छळवाद झाला नाही, कोणालाही आपल्या धार्मिक श्रद्धेपासून वंचित केले नाही येथे आस्तिक, नास्तिक, ऐकश्वरवादी, द्वैतवादी, अद्वैतवादी कोणतीही अवहेलना सहन करावी न लागता गुण्यागोविंदाने नांदत आहेत.

सेवा :– दुसऱ्यास मदत करणे, जगाचे भले करणे हेच आपले कर्तव्य होय, आपण जगाचे भले कशाकरता करावे? तर वर वर पाहता आपण जगाचे भले करीत आहोत असे जरी दिसत असते तरी वस्तुतः आपण आपलेच हित करीत असतो. आपण सतत जगाचे भले करावे आपला तोच अत्युच्च मानस असला पाहिले पण नीट विचार केलात तर आपल्या असे लक्षात येईल, की जगाला तुमच्या मदतीची यात्किंचितही आवश्यकता नाही तुम्ही किंवा मी जागाला साहाय्य करावे म्हणून काही हे जग निर्माण झाले नाही.

समता :– जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या मनातून लिंगभेद, जातिभेद, रंगभेद, जन्मजातभेद आदी सारे भेद नष्ट झालेले असतात व त्याला सर्वत्र एकच एक देवत्व, प्रत्येक व्यक्तिमात्राचे ठायी विराजमान असलेले दृश्यमान होते तेव्हा ती विश्वबंधुत्वापर्यंत पोहोचलेला असतो. तीच अत्युच्च पायरीपर्यन्त पोहचू शकतो, आणि केवळ अशीच माणसे वेदांती होय सर्वत्र देवत्व हेच वेदांताचे सार आहे.

निर्भयता :– बलसंपन्न व्हा! शूर व्हा! सामर्थ्यवान व्हा! सामर्थ्य हीच आजची आवश्यकता आहे, सामर्थ्य हेच जीवन! दुर्बलता हाच मृत्यू! उठा, धीट वना! वलसंपन्न व्हा! भारतास शूरवीर हवे आहेत एखादया अभेदय पहाडासारखे खंवीर वना! भारतास हवी आहे अमर्याद शक्ती, अमर्याद उत्साह, युवापिढी प्रथम शक्तिमान बनू द्या त्या शक्तीमागोमाग धर्म आपोआप येईलच.

कर्मयोग :– आपणास ह्या जगात त्याचे देवाचे कार्य करण्याची संधी त्याने दिली आहे. याबदल आपण आपणास खरे तर भाग्यवान म्हटले पाहिजे. लक्षात ठेवा आपणा काही त्याला मदत करीत नसतो फक्त त्यांने नेमून दिलेले काम करीत असतो. केवळ त्याच्या कृपेनेच आपण ह्या जगात आहोत हे जाणा तुम्ही कसली त्याला मदत करणार? ही मदतीची कल्पना मनातून मुळासंकट उपटून टाका. तुम्ही फक्त त्याची सेवा करू शकता लक्षात ठेवा, जेव्हा तुम्ही कुत्र्याला भाकरी टाकता, तेव्हा त्या कुत्र्यात असलेल्या देवाचीच सेवा करीत असता. होय, या कुत्र्यात देव आहे एवढेच नव्हे सर्वच गोष्टीत परमेश्वर आहे. आपण फक्त त्याची सेवा करायची असते. तत्वज्ञान, ऋजुता, प्रेम ह्या साऱ्या पवित्र गोष्टीची जननी आहे. आपली भारतमाता आजही त्या साऱ्या उदात्त गोष्टी भारतात विद्यमान आहेत साऱ्या जगाचा प्रवास करून आल्यानंतर मी खंबीरपणे सांगतो की आजची भारतीय स्थिती जगातील अन्य कोणात्या ही देशापेक्षा श्रेष्ठ आहे.

वेदांतातील ही तीन तत्वे स्वामीजीनी भक्ती कर्म, व ज्ञान, या शब्दात मांडली सामान्य माणसासाठी भक्ती हाच धर्म, कर्मतत्पर माणसांसाठी कर्म हाच धर्म तर शास्त्रीय दृष्टिकोन ठेवणाऱ्या माणसांसाठी ज्ञानमार्ग हाच खरा धर्म होय, असे स्वामीजींनी प्रतिपादन केले.

कु. आकांक्षा जयस्वाल

बी.एस.सी. भाग–२

# माझा आवडता छंद वाचन



आजच्या जगात ज्ञान हिच शक्ती आहे. म्हणुन वाचनाचे महत्त्व खुप आहे. मी वाचनाची आवड जोपासली आहे. वाचन हाच माझा आवडता छंद आहे. वाचन हा सर्वात कमी खर्चात जोपासला जाणारा छंद आहे. इंग्रजीत एक म्हण आहे. ''रीडींग मेकस मॅन परफेक्ट'' याचा अर्थ होतो की, वाचन व्यक्तीला योग्य बनवतो पुस्तके आपल्याला ज्ञान देतात ते आपल्याला नैतिक सल्लाही देतात. परंतु जर आपली निवड चांगली नसेल तर वाचनाच्या पुर्ण आणि योग्य उपयोग आपण घेऊ शकत नाहीत मला जवळपास सर्व विषयांवरील पुस्तके वाचायला आवडते. आत्मचरित्र आणि सात्विक माहिती असलेली पुस्तके मला जास्त आकर्षित करतात. वाचनातुन मला ज्ञान आणि आनंद दोन्हीही मिळतात. पुस्तकांना मला नम्र बनवले आहे. त्यांनी मला वेगवेगळया लोकांना ओळखण्यास मदत केली आहे. यामुळे वाचन हा माझा आवडता छंद बनलेला आहे.

वाचनामुळे रोजच्या तनावपुर्ण जीवनातुन घटकाभर करमणुकही होते. शिवाय आपल्या कल्पना शक्तिलाही चालना मिळते आपल्यात अधिक संवेदनशीलता निर्माण होते. थोरामोठ्यांची चरित्रे, त्यांचे आयुष्य, त्यांचा संघर्ष आपल्याला प्रेरणा देतात. येनाऱ्या परिस्थितीला तोडून देऊन सकारात्मक विचार करण्योच बळ मिळते. काहीतरी नवीन शिकण्याचा समजुन घेण्याचा आनंद मिळतो. मोकळा वेळ सत्कारणी लागतो प्रकट वाचन केल्याने उच्चार शुद्ध होते.

प्रत्येक माणसामध्ये वेगवेगळे वैशिष्ट्ये असतात. जसे की चित्रकला, भाषण, वाचन, नृत्य आणि कलाकृती अशा बऱ्याच गोष्टी असतात पण मला वाचन ही कला खुप आवडते वाचन हा माझा आवडता छंद आहे. वाचन माणसाला कमी वेळेत आणि कमी वयातच खुप ज्ञानी बनविते. नियमित वाचन केल्याने बुद्धीमत्तेचा विकास झपाट्याने होतो. मानसिक बळ वाढते त्याचबरोबर ज्ञान वाढल्याने आत्मविश्वास सुद्धा वाढतो.

जर तुमचे वाचन अफाट असेल तर त्यातुन मिळालेल्या ज्ञानातून तुम्ही तुमच्या आयुष्यात प्रत्येक अडचणींवर अगदी सहजपणे उपाय शोधून त्यावर मात करू शकता. प्रत्येक माणसामध्ये काही ना काही तरी गुण वैशिष्ट्य असते. आपल्याला ते ओळखावे लागते. असा एक तरी गुण असतोच त्याला आपण छंद असे म्हणतो. माझा छंद म्हणजे मला वाचन करायला खुप आवडते. शाळेमध्ये असताना मी शिक्षक शिकविण्याच्या अधीच माझे धडे वाचून

करायला खुप आवडते. बऱ्याच वर्षापासुन मला पेपर वाचण्याची खुप आवड असायची किंवा आता देखील आहे. पेपर वाचण्याचा एक फायदा आहे तो म्हणजे आपल्याला जगात काय चालले आहे ते समजते जसजसे मी मोठे होत गेले तसतसे मी ग्रंथालय मधील पुस्तके घेऊन वाचन करू लागले. त्याचबरोबर अनेक महापुरूषांचा इतिहास वाचला आहे.

तुम्ही जर पुढे जाऊन मोठे प्रशासकीय अधिकारी होणार असाल जसे आय.पी.एस, डी.वाय.एस.पी, पी.एस.आय., इन्कम टॅक्स ऑफिसर होणार असाल तर तुमचे अवांतर वाचन असनं खुप गरजेच आहे. वाचन हा छंद इतर छंदापेक्षा खुप चांगला आणि ज्ञान देणारा छंद आहे इतर छंद सुध्दा तसे खुप चांगले आहेत पण हा छंद तुमच्या बुद्धीचा विकास लवकर करतो. अवांतर वाचनाने तुमचे अज्ञान दुर होते. तसे पाहिले तर आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील ज्ञान असने गरजेचं आहे. नाहीतर या जगातील लोक तुम्हाला फसविल्या शिवाय राहणार नाहीत, तुमचा गैरफायदा अशी माणसे नक्की घेतील कारण त्यांना माहीत असते की, तुम्हाला या गोष्टीतील काहीच माहीत नाही, म्हणुन जितके शक्य होईल तितके ज्ञान आणि माहिती आपण मिळवली पाहिजे.

प्रत्येक माणसाचे छंद वेगवेगळे असतात आणि आयुष्यात एक तरी छंद असणं किंवा एखाद्या गोष्टीची आवड असण अत्यंत गरजेचे आहे. एक चांगला छंद माणसाला जगायला शिकवतो. माझ्या महाविद्यालयामध्ये जिथे मी शिक्षण घेत आहे. तिथे सुद्धा खुप असे मोठे ग्रंथालय आहे. मिळालेल्या तासिकेमध्ये मी तिथे रोज न चुकता दहा मिनिटासाठी का होईना ग्रंथालयात, जाते आणि मिळालेल्या खाली वेळेस मित्र-मैत्रिनीसोबत गप्पा गोष्टी करण्यापेक्षा मला ग्रंथालयात जावून अभ्यास करणे जास्त आवडते महाविद्यालयात शिक्षण घेत असताना असा एकही दिवस नसे की मी ग्रंथालयात नसेल गेली महाविद्यालयास आल्यानंतर वर्ग भरण्याच्या आधी मी वर्ग तासिका साडे दहाला सुरू होत असल्यामुळे रोज महाविद्यालयात लवकर आल्यानंतर मी न चुकता ग्रंथालयात जाऊन आपल्या तासिका विषयाचा किंवा इतर घडामोंडीचा अभ्यास करून तासिकेच्या वेळेपर्यंत म्हणजे साडे दहाला पाच ते दहा मिनीट वेळ असतानाच ग्रंथालयातुन निघुन आपल्या वर्ग तासिकेला येऊन बसायची आणि बसते. वाचनाची आवड ही मला लहानपनापासुन खुप आहे. जेव्हा जेव्हा खाली वेळ मला मिळतो तेव्हा मी माझी ही वाचनाची आवड जोपासते प्रवास करताना देखील मी पुस्तक वाचयची. माझ्या रोजच्या महाविद्यालयातील प्रवासात मी माझ्याकडे असलेल्या फावल्या वेळेत आपल्या मोबाईलच्या मदतीने बसल्या बसल्या पुस्तकालयामध्ये पुस्तक वाचन करायची यांच्यामुळे माझा वेळ पन वाया जात नव्हता आणि माझा अभ्यासही व्हायचा आज तंत्रज्ञान विज्ञानाने प्रगती केल्यामुळे आपण आपल्या कोमामध्ये खुप काही ज्ञान मिळवू शकतो. यामुळे वेळेचा पन चांगला उपयोग होतो. पुस्तक हाच माझ्यासाठी सर्वात चांगला

# राजकारण..



बॉलिवुड...राजकारण या क्षेत्रातला सावळा गोंधळ बघुन झाला...करोना महामारीचा जगभर चाललेला थैमान बघणं चालुच आहे... शिक्षण क्षेत्रात डोकावून बघितलं तर तिथही सगळीजणं गोंधळ लेलीच आहे...वैदयकिय क्षेत्रातही नुसती धावपळच सुरू आहे...वैद्यकिय क्षेत्रातही नुसती धावपळच सुरू आहे... करोनावरची लस तयार करण्यासाठी डॉक्टर मंडळी रात्रं-दिवस झटून काम करतं आहेत...या सगळयांची कमतरता म्हणून कि काय अतिवृष्टी मुळे शेतकरी हैराण आहे... यातुन माणसाने कधी आणि कसे सावरायचे हा एक चिंतेचाच विषय आहे...

असो... चारी बाजुने चि फक्त संकटच दिसत असतानां यातुन मार्ग काढणे आणि जगविणे हेच तर माणसाचे खरे कौशल्य... चला बाकीच्या गोष्टी थोंड बाजुला ठेवुयात... एक मुद्दा इथे सांगावासा वाटतो... खरं तर राजकारणात मला रस नाही... त्यातले मलो काही कळतं नाही... त्यावर बोलण्याचा मला हक्कही नाही. पण आजची पशिस्थिती बघता एक सांगावेसे वाटते... आज प्रत्येक क्षेत्रात करिअर करायचे असल्यास स्पर्धा परिक्षेला पर्याय नसतो... पोलिस भरती... मिलिट्री भरती... नेव्ही... मेडिकल... शिक्षण... एअर फोर्स आणि अशी अनेक क्षेत्र आहेत जिथे स्पर्धा परिक्षेत यशस्वी झाल्यावरच त्या-त्या आवडीच्या क्षेत्रात करिअरची संधी मिळते... पण राजकारण याला अपवाद आहे... मंत्रीपद मिळवायला कोणतीही स्पर्धा परिक्षा नाही आणि शिक्षणाची अट नाही... जनमानसात... सामान्य माणसांमध्ये थोडीशी चमचेगिरी... लालुच... थोडीशी धाकदपटशाही आणि दादागिरी केली म्हणजे कोणीही मंत्रीपद मिळवुन मुन्नादादा किंवा मुन्नाभाई म्हणून व्हाईट कॉलरनी मिरवायला मोकळा... पण माफ करा हे योग्य आहे का... थोडा आपण दृष्टिकोण बदलुन गंभिरतेने याचा विचार करायलाच हवा... मंत्रीपद मिळविण्यासाठी त्या क्षेत्रात आधी स्पर्धा परिक्षा देणे म्हहत्वाचे... मग जनमन मिळविणे...

कल्पना थोडी अवघड आणि न रूचणारी आहे पण राजकारणात निर्मळ पारदर्शकता हवी असेल तर काहीशी अशी परिक्षा घेणे आवश्यक आहे... आणि वर्षभरासाठी राजकारणात प्रयोगिक तत्वावर काम करून स्वत:मधली त्या क्षेत्रात काम करण्यासाठी लागणारी क्षमता सिद्ध झाल्यावरच कायमस्वरूपी मंत्रीपदावर रूजु करून घेण्याचा नियम लागु करण्यात यावा... (वैदयकिय क्षेत्रातही डॉक्टरांना सुरूवातीला सहा महिने Internships करावी लागते...) प्रत्येक क्षेत्रात काळाप्रमाणे बदल का नको... सकाळरात्मक दृष्टिकोण ठेवुन यावर विचार करायला काय हरकत आहे... तर मग लागा अभ्यासाला... तयार आहात ना... All the Best... (मि मात्र या क्षेत्रातली ढ विद्यार्थीनी आहे... नापास...)... यार... इथे बॉलिवुड मध्ये येण्यासाठी सुद्धा कलाकाराला आधी ॲक्टिंग स्कुलमध्ये जावे लागते... पण कलाकारांचा रंगमंच वेगळा... आणि मंत्रिपदावर बसुन देशाला रंगमंच चालवणे वेगळे... कलाकाराची जबाबदारी वेगळी... मंत्रीपदाची जबाबदारी वेगळी... पण दोघांनाही जनमानसा समोर अगोदर स्वत:ला सिद्ध करून दाखवावेच लागते... थोडक्यात काय तर ही दुनियादारी चमत्काराला नमस्कार करणारी आहे...

माफ करा... हे सगळं रोखठोक आहे... पण समाजामध्ये सकारात्मक बदल घडवून आणायचा असेल तरं थोडा बदल आवश्यक आहे... माणुस आजारी पडल्यावर नाईलाजाने कडु औषध घेतोच त्या शिवाय त्याच्या प्रकृतीत सुधारणा होत नाही... मग येणाऱ्या पिढीसाठी हा बदल स्विकारणार ना... !! सत्यमेव जयते!!

कु. प्राची बोरकर
बी.कॉम. भाग -३

# वक्त नही

हर खुशी हैं लोंगो के दामन मे
पर एक हसी के लिये वक्त नहीं
दिन रात दौंडती दुनिया मे,
जिन्दगी के लिये ही वक्त नही

सारे रिस्तों को तो हम मार चुके
अब उन्हे दफनाने को भी वक्त नहीं

सारे नाम मोबाईल में है,
पार दोस्ती के लिए वक्त नही
गैरों की क्या बात करें
जब अपनों के लिये ही वक्त नही

आखों में है नींद भी
पर सोने का वक्त नहीं
दिल है गमों से भरा हुआ
पर रोने को भी वक्त नही

पैसो की दौंड में ऐसे दौंडे
की थकने को भी वक्त नही
पराये एहसानों की क्या कद्र करें
जब अपने सपनों के लिये ही वक्त
नही

तू ही बता ऐ जिन्दगी
इस जिन्दगी का क्या होगा
हर पल मरने वालों को

**कु. नंदिता बैसवारे**

बी.एस.सी. भाग-३

# स्त्री भृणहत्या



नमस्कार मित्रांनो,

आपण आज म्हणतो की मुलापेक्षा मुलगी बरी पण हे खरं आहे काय? आपण मुलीला सोबत घेऊन जपत आहो काय?

एका घरी आईच्या पोटात दोन मुली आहेत. हे जेव्हा त्या कुटुंबाला माहित पडले तेव्हा लगेच त्यांनी म्हटले की गर्भपात करून घे पण त्या गर्भाला सात महिने झालीय होती म्हणून गर्भपात होण शक्य नव्हत.

जेव्हा त्या दोन मुलीचा जन्म झाला तेव्हाच त्या मुलींना कचऱ्याच्या कुंडीत फेकून दिले.

काय दोष होता त्या चिमुकल्यांचा?
काय गुन्हा होता त्या लेकरांचा?

आपण सर्वांना घरात सुन हवी, पत्नी हवी मग मुलगी का नको, आपला हा समाज कुठे चालला आहे? अरे मित्रांनो आता तरी मुलीचे महत्त्व समजून घ्या कारण

''मुलापेक्षा मुलगी बरी प्रकाश देते दोन्ही घरी'' मुलींना जगण्याचा आणि शिक्षणाचा

समान हक्क दया,

**आकांक्षा ढगे**

बी.एस.सी. भाग-३

# आई



कोणत्या शब्दात सांगू आई
तू माझ्यासाठी काय आहेस...?
भुकेल्या जिवाचा मायेचा घास तू
वेदनेनंतरची
माझी पहिली हाक तू
अन् माझा प्रगाढ विश्वास तू
हृदयाच्या स्पंदनातील माझा
प्रत्येक श्वास तू...!
जीवनातील माझ्या सुखाची बाग तू

आधीमधी रागात सूर्याची आग तू
अंधारालाही दूर करणारा प्रकाश
तू
माझी मायेची धरती अन् छायेच
आकाश तू....!!

मायेच्या पावसाचा ओलावा तू
जीवनी सुखाची गारवा तू
आई, दूधरूपी अमृताची गोडवा तू
अन् शेवटच्या क्षणापर्यंतचा कुशीतील

कु. निखीता माशलकर
बी.ए.भाग -२

# आयुष्य...

आयुष्यभर सोबत असून,
जवळ कधी बसत नाही.
एकाच घरात राहुन आम्ही
एकमेकास दिसत नाही

हरवला तो आपसातला
जिव्हाळ्याला संवाद
एकमेकास दोष देवून
नित्य चाले वादविवाद

धाव धाव धावतो आहे
दिशा मात्र कळत नाही.
हृदयाचे पाऊल कधी,
हृदयाकडे वळत नाही.

इतक जगून झाल पण,
जगायलाच वेळ नाही
जगत आहोत कशासाठी
काहीच कसला मेळ नाही.

क्षण एक येईल असा
घेऊन जाईल हा श्वास
अर्ध्यावरच थांबलेला
असेल जीवन प्रवास

अजूनही वेळ आहे,
थोड तरी जगून घ्या
सुंदर अशा जगण्याला
डोळे भरून बघून घ्या



कु. खुशबु लोणारे
बी.एस.सी. भाग -३

# पिक एका पाण्यानं नेलं

झाड तोडून तोडून सारं रान उजाड केलं
काऊन म्हणता पिक एका पाण्यानं
नेलं ।।धृ।।

झाड तोडून तोडून फर्निचर केली
पाणी येत नाही म्हणून बोंबा बोंब केली
जंगल तोड झाली म्हणून गावात आले
प्राणी
पक्षांचे घर तोडून त्याना केली
केविलवाणी ।।१।।

जीवनदान म्हणून सर्वाना पुरवतात
आक्सीजन
तरी त्यांना मारून तोडून टाकतात सर्व
जग
पाणी येत नाही म्हणून म्हणतात देव धर्म
करा
अंधश्रद्धा पाळण्यापेक्षा सर्वजन झाडे
तयार करा ।।२।।

झाडं नाही म्हणून ढग मोकाट सुटलं
पाण्याची वाट पाहुन डोळे आता फुटलं
पाण्याने शेतकऱ्यांचे हाल हाल केले
तरी म्हणतात पिक एका पाण्याने
नेले ।।३।।

कु. आरती कुबडे
बि.ए.भाग - २

# भ्रूण हत्या

शिक्षणाची ढाल घेऊन
आला घाला बेकारिला
वाचवा निष्पाप कोवळ्या कळीला
आणि थांबवा भ्रूण हत्येला.....

मनात आत्मविश्वासाची चमक
दिसु दया, स्वप्नाला कर्तव्याची
निसाल, दया, चेहऱ्यावर
आत्मानंद असु दया....

डोळयात आत्म विश्वासाची चमक दिसु
दया...
चेहऱ्यावर निर्धाराची चमक असु
दया...
अत्याचार मोडण्याची धमक असु दया....

कु. अवंती बेहाते
बि.एस.सी. भाग-३

# वराडी बाप

माया बापान केले कष्ट।
आमचं खाऊ खाऊ ऊष्ट।।
माया बाप जाई पाई।
अन आमाले चप्लीची घाई।।

पाटी लेखना साटी, व्यापारी घेई माया बापा जोळून व्याज।
अन आमी शिकल्यावर आमाले, बापा ची येते लाज।।
मले विचारल माया दोस्तान, हा होयेका तुया बाप।
मनलं मानुस होये माया, फाल्तुचा डोक्याले ताप।।

आला डोळे चुरत चुरत, बाप स्वता:च घरी।
कस आहे पोट्मनुन माई माय बापले ईचारी।।
बाप माया मरून गेला वुद्यालेधखा बसुन।
मी अन माई बायको गेलो घुमाले मैतिपासुन।।

समोर माया झल्या कश्या बेकार गती।
तवा माया पायाले नोति डिकली माती।।
मी झालो मतार काम नोहते माये पाय अन हाल।
सुनले मंनल पाणी आन मणुन मारलि त्यान मले लात।।

करमाचे फळ भोक्ता भोक्ता आजच्या सुनले तरि मेलो।
मशिनिच्या युगात कुटले खोड मशिनित ताकुन्च मेलो।।
अस कदि करूनका माय-बापाला द्या तुमि पुरनपने तरि मेलो।
मशिनिच्या युगात कुटले खोड मशिनित ताकुन्च मेलो।।
अस कदि करूनका माय-बापाला द्या तुमि पुरनपने तरि सुख।
तेव्हा दूर होईल तुमच्या आयुष्यातील सर्व दुख।।

कु.लिना गोतमारे
बी.कॉम. भाग - ३

# मी काय विसरली

कृत्रिम सुंगध आला तर,
फुलांचा सुंगध विसरली
स्वार्थी नाती जोडलो तर,
खरे प्रमे करणे विसरली
घरान टिव्ही आला तर,
बोलणे विसरली
कॅक्युलेटर आले तर,
मी पाढे विसरली
शहरात राहणे आलेतर
मातिचा सुंगध विसरली
बँकेशी नाते जुकले
तर पैसा विसरली
व्हॉटसअॅप आल्यामुळे
मुखाने बोलणे विसरली

कु. दिव्या घुबडे
बी.कॉम. भाग-३

# अनाम वीरा

अनाम वीरा जिथे जाहला तुझा जीवनान्त
स्तंभ तिथे ना कुणी बांधला, पेटली न वात!

धगधगतां समराच्या ज्वाला या देशा
जळावयास्तव ससारातुन उठोनिया जाशी!

मूकपणाने तसी लोपती संधयेच्या रेषा-
मरणामध्ये विलीन होसी, ना भय ना आशा!

जनभक्तीचे तुझ्यावरी नच उथाणले भाव
रियासतीवर नसे नोंदले कुणी तुझे नाव!

जरी न गलिल भाट डफावर तुशे यशोगान!
सफल जाहले तुझेच हे रे तुझेच बलिदान!

काळोरवातुनि विजयाचा ये पहाटचा तारा
प्रणाम माझा पहिला तुजला मृत्युंजय वीरा!



**कु. विद्या पाल**
बि.एस.सी.भाग - ३

# माझा भाऊ

तुला नकळत समजुन का समाजायचं
तुझ्यासारख्या भाऊ दिला म्हणुन देवाला हात का नाही जोडायच
तु प्रत्येकाला भेटू दे अस का म्हणायचं
तु माझ्यात वळ आहे मग तुला मीच जपायचं तुझ्यासोबत रहायचं
कारण मला आयुष्यात प्रत्येक क्षणाला किती साध आणि सरळ आहे ना जिथे
भाऊ आपलं बहिण भावाचनात मी काही न बोलताच
तुला सर्व काही समजतं.

मी भाऊ बघ आज अस झालय म्हणताच काळजी नको करू सर्व ठिक होईल अस म्हणवतो
तुझे हे शब्द ऐकताच
माझे अर्धे टेन्शन कमी होत
बहुतेक त्यालाच म्हणतात
बहीन-भावाचं नात

**कु. अश्विनी समर्थक**
बी.कॉम. भाग-२

# मला थोडातरी आधार द्या हो..!

टाळी वाजतांना तर त्यांना
दोन हातांची गरज असते हो
माझा स्वत:वर विश्वास तर आहेच
पण तुमचाही असुद्या हो.

तुम्हाला जन्म देणारी पण एक
स्त्रिच आहे हे कधी विसरू नका हो
मग मला या जगात येतांना
माझा गळा का दाबल्या जाते हो ?

मी मोठे होत असतांना योग्य
ते दिशा मला दाखवा हो
मी लहानपणीच ओल्या मातीचा गोळा
मला योग्य ते मार्गदर्शन द्या हो.

मला रस्त्याने जातांना लोकांचा माझ्याकडे
बघण्याचा नकारात्मक दृष्टीकोण बदलवा हो
मला लोकांच्या नजरेत शूरविर लक्ष्मीबाई,
राज्याचे एकमात्र ढाल बनायचे आहे हो.

माझ्यावर आलेल्या विकट परिस्थितीमध्ये
मला एकटे पाहुन चालनार नाही हो
तुमच्यासाठीच मला घडायचे आहे.
माझा अर्ध्या रस्त्यात हात सोडु नका हो

मला कधीही मुलापेक्षा कमजोर
किंवा डोक्यावरचे ओझे समजुनका हो
मला कधी समजुन घेण्याचा प्रयास करा
मी मुलापेक्षाही श्रेष्ठ आहे हो.

माझा जन्म होताच तुम्ही माझ्या लग्नासाठी
पैसे, दागिने गोळा का करता हो ?
पण थोडा दृष्टीकोन बदलवा तुमचा
कधी माझ्या शिक्षणाचा विचार करा हो.

यशाच्या शिखरावर चढतांना लग्नाचा
मोह दाखवून शिक्षणाची चढण्याची दोरी
तोडु नका हो
ईश्वराने सगळ्यांना एक सुप्त गुण दिला
आहे, तो दाखवायला थोडा तरी वेळ द्या
हो.

सामान्य जीवन तर सगळेच जगतात
पण मला काही वेगळच करायच आहे हो
मला तुमचा थोडा तरी आधार द्या
कारण अर्थ विना जीवन व्यर्थ असते हो

कु. वैष्णवी लोखंडे
बी.ए.सी. भाग-१

# आले तर

घेऊन घे झोळीत तुझ्या
जेही वाटेत दान आले तर..
घाबरू नको वाटेत तुझ्या
संकट तुफान आले तर...!

माणूस आहेस मित्रा तू
मग माणूस होऊन जग
टाळ त्यांना वाटेत तुझ्या
हिंदू मुसलमान आले तर...!

जातिवाद, भेदभाव बार
ज्वलंत प्रश्न आहेत इथले,
तु घेरे उंच भरारी मित्रा
तुझे आसमान आले तर..!

नांदत होती सुख-समृद्धी
आपुलकी जिव्हाळा जिथं,
उदास नको होऊ मित्रा
वाटेत गाव वसाठा आले तर..!

शिक्षण फार महत्वाचं आहे
हा अन्याय मिटवायला,
धडा शिकव चांगलाच
वाटेत कधी वेईमान आले तर..!

जसे कर्म, तसे फळ मिळतील
जीवनाच्या बागेत तुला,
तू घावरू नको मित्रा दु:खा कधी,
वाटेत मोठे लहान आले तर..!

मित्रा चालुन चालुन दमशील
कधी वाटेत जीवनाच्या
विश्राम घळीभर घे झाडाखाली,
वाटेत पिंपळपाण आले तर..!

कु. प्रगती झाडे
बी.एस.सी. भाग-१

# गरिबाच्या लेकराला रोजचाच मार आहे.

देवळात फुले आहे
फुलात हार आहे
गरिबाच्या लेकराला
रोजचाच मार आहे

दानपेटीत टाकयला पैसे
आणि दगडाच्या मुर्तीला दुध आहे
गरिबाच्या लेकराला मात्र
भुकेने तडफडलेली हाक आहे

श्रीमंतांच्या पैशांनी त्यांच्या
इज्जतीची धार आहे
गरिबाच्या लेकराला मात्र
नादारीचाच शाप आहे

उरलेले अन्न उएकंडयावर
फेकतांना जेव्हा त्या गरिबांची
आठवण येत नाही ना
तिथे खरां माणुसकीचा घात आहे

रस्त्यावरचे ठोकरे खाऊन
गरिबांच्या खलाचीच धार आहे



कु. युक्ता रहेजा
बी.एस.सी. भाग-३

जिरवाला तर तेच पाणी तुमच्या कामात येईल.

जर का जमिनितील पाण्याचा साठा कमी झाला तर पाणी दुष्काळ तर पडेलचं पण त्यामुळे शेतकऱ्यावर सुदूधा सकटाची बाब येईल. कारण जेव्हा पाऊस पडत नाही, तेव्हा शेतकरी हा भू गर्भातील पाणी आपल्या शेतीला देतो आणि अन्न पिकवितो. पाणी हे सर्वांत म्हत्त्वाचे घटक आहे. जर पाणी असेल तर ही सृष्टी जिवंत राहिल आणि जर का पाक्षच नाही से झाले तर या सृष्टीचा नारा झाल्याविणा राहणार नाही. त्यासाठी आपल्यालाच उपाय करावे लागेल आपण कुठूनतरी सुरूवात केली आणि आजपासून विचार केला की आम्ही जलस्वरक्षण करू तर नक्कीच कधी ना कधी आपल्याला यश प्राप्त होईल. आणि पाणी हे आपलं जिवन ते कधिही आपण सांभाळून जपून वापरावे. कारण जल ही जिवन आहे.



कु. जान्हवी माहुरे

बि.एस.सी. भाग -३

# परत एकदा भेटूया ना यार

वर्गात व्हवली आपली
एवढी एकमेकांशी दोस्ती
पण आता आठवतेय यार
केलेली ती सगळी मस्ती
बर्गातल्या प्रत्येकाची
एन्ट्रीच होता भारी
कधी कधी एन्नॉय केलीय
बर्गातली मारामारी
होती शिक्षकांच्या डोक्याला ताप
कारण होतेच सगळे लसी कलाका
पण आज प्रत्येक क्षणाला तुमची
आठवण येते यार
आयुष्याच्या एका टोकावर झालो
आपण बेगळे
आपापल्या कामामध्ये आता
गर्क असतो सगळे
कॉलेजमधेही भेटले मित्र
करतो आताही मस्ती
पण शालेमधल्या दोस्तीची
गोष्टच होती बेगळी

कु. आस्था रेवतकर

बि.ए. भाग - १

# या भारतात बंधुभाव नित्य वसू दे



या भारतात बंधुभाव नित्य वसू दे, दे वरचि असा दे
हे सर्व पंथ संप्रदाय एक दिसू दे, मतभेद नसू दे

नांदोत सुखे गरीब–अमीर एक मतांनी
मग हिंदू असो ख्रिश्चन वा हो इस्लामी
स्वातंत्र्य–सुखा या सकलांमाजि वसू दे
दे वरचि असा दे

सकळांस कळो मानवता, राष्ट्रभावना
हो सर्व स्थळी मिळुनी समुदाय प्रार्थना
उद्योगी तरूण शीलवान येथे असू दे
दे वरचि असा दे

जातिभाव विसरूनिया एक हो आम्ही
अस्पृश्यता समूळ नष्ट हो जगातुनी
खलनिंदका मनीही सत्य न्याय वसू दे
दे वरचि असा दे

सौंदर्य रमो घराघरात स्वर्गीयापरी
ही नष्ट होऊ दे विपत्ती भीती बावरी
तुकड्यास सदा या सेवेमाजी वसू दे
दे वरचि असा दे

**- संत तुकडोजी महाराज**

# व्यवस्थापन समिती



डॉ. निलेश तुळसकर



श्री. पांडुरंगजी तुळसकर



प्रा. डॉ. उमेश तुळसकर



श्री. विजयराव ईटनकर





सौ. रेखा तुळसकर

## विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट

(रजि. नं. महा. २०४/८५ एफ ६७० वर्धा)

### संचालक मंडळ

| | |
|---|---|
| श्री. पांडुरंगजी तुळसकर | अध्यक्ष |
| प्रा. डॉ. उमेश तुळसकर | सचिव |
| डॉ. निलेश तुळसकर | उपाध्यक्ष |
| श्री. विजयराव ईटनकर | सहसचिव |
| सौ. रेखाबाई तुळसकर | कोषाध्यक्ष |
| श्रीमती शांताबाई तळवेकर | सदस्या |
| प्रा.डॉ. नयना शिरभाते | सदस्या |



श्रीमती शांताबाई तळवेकर



प्रा.डॉ. नयना शिरभाते



''हिंगणघाट क्षेत्रातील मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणून तळागाळापर्यंत उच्च शिक्षणाची गंगोत्री पोहचवून महिला सक्षमिकरणाच्या दिशेने टाकलेले पाऊल पुर्णत्वास जाण्याचा संकल्प आणि त्याच उद्देशाने प्रेरीत होवून केलेला हा यशस्वी प्रयत्न'

....... पांडुरंग तुकसकर

**मातोश्री कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालयीन विविध शाखा**

**कला शाखा**
(B.A.)
(मराठी माध्यम)
प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष

**वाणिज्य शाखा**
(B.Com)
(इंग्रजी माध्यम)
प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष

**विज्ञान शाखा**
(B.Sc.)
प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष

**संस्थेद्वारे चालविण्यात येणारे विविध शाळा व महाविद्यालय -**

- विद्या विकास कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, समुद्रपूर
- विद्या विकास कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, समुद्रपूर
- विद्या विकास उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम, समुद्रपूर
- विद्या विकास प्राथमिक व उच्च प्राथमिक विद्यालय, हिंगणघाट
- विद्या विकास हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यालय, हिंगणघाट
- मातोश्री कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट